लोकमत

# अंतिम वर्षाव्यतिरिक्त अन्य सर्व परीक्षार्थ्यांचा पुढील वर्षात प्रवेश

कोल्हापूर : अंतिम वर्षाव्यतिरिक्त इतर वर्षांच्या सर्व अभ्यासक्रमांचे परीक्षार्थी कॅरी फॉरवर्ड पद्धतीनुसार पुढील वर्षामध्ये प्रवेशासाठी पात्र असणार आहेत. वार्षिक परीक्षा पद्धती असणाऱ्या पदव्युत्तर पदविका अथवा पदविका अभ्यासक्रमाच्या परीक्षार्थ्यांची परीक्षा होणार आहे, त्याबाबतचा निर्णय शिवाजी विद्यापीठाने घेतला आहे.

ज्या परीक्षार्थ्यांची अंतर्गत परीक्षा पूर्ण झाली नसेल, अशा परीक्षार्थ्यांची अंतर्गत परीक्षा पूर्ण करून घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी गैरहजर असणाऱ्या परीक्षार्थ्यांना अंतर्गत परीक्षेमध्ये गुणांकन देण्यात येणार नाही. परीक्षेवेळी सर्व संबंधित घटकांनी सॅनिटायझेशन प्रोटोकॉलचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. चालू सत्राच्या परीक्षेव्यतिरिक्त पूर्वीच्या सत्रातील अनुत्तीर्ण अथवा गैरहजर विषयासाठी परीक्षा अर्ज भरलेल्या परीक्षार्थ्यांची परीक्षा जुलैनंतर पुढील चार महिन्यांत आयोजित केली जाणार असल्याची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी शुक्रवारी दिली.

## १ ते ३१ जुलै दरम्यान परीक्षा

अंतिम सत्राच्या परीक्षा दि. १ ते ३१ जुलै दरम्यान घेण्याचे नियोजन केले आहे. विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार उन्हाळी सत्राच्या परीक्षा आणि निकाल घोषित करण्याची कार्यवाही परीक्षा विभागामार्फत केले जाणार आहे.



## आकडेवारी दृष्टिक्षेपात

| ७५ हजार | १ लाख ४० हजार |
|---|---|
| अंतिम वर्षाचे विद्यार्थी | प्रथम, द्वितीय वर्षाचे विद्यार्थी |

## तर या विषयांची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात

स्कील डेव्हलपमेंट कोर्स, डेमोक्रसी, इलेक्शन अँड गुड गव्हर्नन्स, तसेच कम्युनिकेशन स्कील या विषयांची परीक्षा झाली असेल, तर त्याचे गुण विचारात घेऊन निकाल घोषित करण्यात येईल. ज्यांची या विषयाची परीक्षा झालेली नाही त्यांची परीक्षा पुढील शैक्षणिक सत्रात अथवा वर्षात घेऊन त्याचा निकाल त्यावेळी घोषित करण्यात येईल, अशी माहिती परीक्षा मंडळाने दिली आहे.

# विद्यापीठाकडून परीक्षा घेण्याचे नियोजन

## परीक्षा विभागाची कार्यवाही सुरू; सॅनिटायझेशन प्रोटोकॉल बंधनकारक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्रातील परीक्षा घेण्याबाबत नियोजन सुरू झाले आहे. नुकतीच विद्या परिषदेत विद्यापीठ नियुक्त समितीच्या अहवालास मान्यता मिळाली आहे. त्यानुसार परीक्षा विभागाकडून कार्यवाहीस प्रारंभ झाला आहे.



**शिवाजी विद्यापीठातून...**

कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचे घोषित केले आहे. विद्यापीठ परीक्षा, वेळापत्रक नियोजनाबाबत समितीच्या शिफारसी शासनाने स्वीकारल्या आहेत. विद्यापीठाने गठीत केलेल्या १८ सदस्यीय समितीचा अहवाल अधिकार मंडळासमोर सादर झाला आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या उन्हाळी सत्र परीक्षा, निकाल घोषित करण्याबाबत परीक्षा विभागाकडून कार्यवाही सुरू झाली आहे.

अंतिम सत्रासाठी परीक्षा अर्ज भरलेल्या परीक्षार्थींचे १ ते ३१ जुलै या कालावधीत लेखी, प्रात्यक्षिक, मौखिक परीक्षा आयोजन केले जाणार आहे. अंतिम वर्षाचे नियमित व रिपीटर परीक्षार्थी यांचा समावेश असेल. चालू सत्राव्यतिरिक्त पूर्वीच्या सत्रातील अनुत्तीर्ण व गैरहजर विषयांसाठी परीक्षा अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा जुलै महिन्यात होणार नसून पुढील चार महिन्यांत आयोजित केली जाईल.

### मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची आज कुलगुरूंसमवेत बैठक

शैक्षणिक वेळापत्रक व अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासंदर्भात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शनिवारी (दि. ३०) दुपारी १२.३० वाजता राज्यातील सर्व कुलगुरूंची व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक बोलावली आहे. यावेळी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांच्यासह मान्यवर सहभागी होणार आहेत.

फक्त चालू परीक्षेसाठी अंतिम वर्षाशिवाय इतर वर्षांचे सर्व अभ्यासक्रमांचे परीक्षार्थी कॅरी फॉरवर्ड पद्धतीनुसार पुढील वर्षाच्या प्रवेशास पात्र असतील. वार्षिक परीक्षा पद्धती असणाऱ्या पदव्युत्तर पदविका, पदविका अभ्यासक्रमांच्या परीक्षार्थींसाठी अंतिम परीक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे. 'पर्यावरण अभ्यास' या विषयाची लेखी परीक्षा होणार नसून प्रकल्प अंतर्गत गुणावर करून श्रेणी, गुणदान करण्यात येणार आहे. परीक्षेवेळी महाविद्यालयांनी विद्यार्थी व शिक्षक यांच्या सुरक्षेला प्राधान्य देत सॅनिटायझेशन प्रोटोकॉलचे पालन करणे गरजेचे आहे, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी सांगितले.

मटा अँकर

### अंतिम वर्षाबाबत मनुष्यबळ विकासमंत्र्यांचे स्पष्टीकरण

# परीक्षांबाबतचा निर्णय राज्यांनी घ्यावा



म. टा. प्रतिनिधी, पुणे

'देशातील विद्यापीठ व महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाची परीक्षा घेण्याबाबतचा निर्णय केंद्र सरकारने जाहीर केला आहे. मात्र, राज्यातील करोनाची स्थिती पाहता तेथील राज्य सरकार व विद्यापीठांनी परीक्षेसंदर्भात योग्य तो विचार करावा,' असे स्पष्टीकरण केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री रमेश पोखरियाल निशंक यांनी दिले आहे. दरम्यान, परीक्षांच्या मुद्द्यांबाबत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आज, शनिवारी राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंशी संवाद साधणार आहेत.

नॅशनल असेसमेंट अँड अ‍ॅक्रिडिएशन कौन्सिल (नॅक) यांच्यातर्फे करोनानंतर 'उच्च शिक्षणातील आव्हाने आणि संधी' या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. पोखरियाल यांनी ऑनलाइनच्या माध्यमातून देशातील सर्व विद्यापीठाचे कुलगुरू, अधिष्ठाता, प्राध्यापक, प्राचार्यांची संवाद साधला. या वेळी त्यांनी उच्च शिक्षणासंदर्भात आढावा घेऊन करोनानंतर शिक्षणात आमूलाग्र बदल करण्याचे सूचित केले.

या वेळी पोखरियाल म्हणाले, 'राज्यातील सर्व विद्यापीठ व महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाची परीक्षा घेण्यात येणार आहोत. मात्र, राज्यातील करोनाची स्थिती पाहता राज्य सरकार व विद्यापीठांनी परीक्षेसंदर्भात योग्य तो विचार करायचा आहे.'

## 'शाळा जुलैमध्येच सुरू'

**पुणे :** 'करोनाच्या संकटकाळात पालक आणि मुख्याध्यापकांना मुलांबाबत असलेली काळजी लक्षात घेऊन, राज्यातील शाळा १ जुलैला सुरू करण्याचा राज्य सरकारचा विचार सुरू आहे,' अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी दिली. त्यामुळे राज्यात जून महिन्यात शाळा सुरू करण्याच्या चर्चेला पूर्णविराम मिळाला असून, पालक, शिक्षक, कर्मचारी आणि मुख्याध्यापकांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे.

## कुलगुरूंशी आज चर्चा

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेसंदर्भात राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठाचे कुलगुरूंशी आज, शनिवारी दुपारी साडेबारा वाजता 'व्हिडिओ कॉन्फरन्सिंग'द्वारे चर्चा करणार आहेत. त्यानंतर याबाबत निर्णय जाहीर होईल.

## अंतिम वर्षाच्या परीक्षा १ जुलैपासून

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

करोना संसर्गच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ व महाविद्यालयीन अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा एक ते ३१ जुलै या कालावधीत घेण्याबाबत राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयाने हिरवा कंदील दाखवला आहे. दरम्यान, या संदर्भात शिवाजी विद्यापीठस्तरावर डॉ. धनाजी कणसे यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या १८ सदस्यीय समितीने सुरक्षित वावर नियमावलीचे पालन करून परीक्षांसंदर्भात वेळापत्रक करण्याबाबत शिफारशी केल्या होत्या. राज्य सरकारच्या निर्णयानंतर समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारे शिवाजी विद्यापीठाच्या वतीने जुलैमध्ये होणाऱ्या परीक्षांचे नियोजन करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

⏩ सविस्तर वृत्त...२

# अंतिम वर्षांच्या परीक्षा नेहमीप्रमाणे घ्या

कोल्हापूर : प्रतिनिधी

अंतिम वर्षांच्या परीक्षा दरवर्षी होणाऱ्या परीक्षाप्रमाणे घ्याव्यात, अशी शिफारस नवीन शैक्षणिक सत्र आणि परीक्षा वेळापत्रक निश्चिती समितीने शिवाजी विद्यापीठाला केल्या आहेत. कोरोनामुळे इतर वर्षांच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. मात्र, अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यात येणार आहेत. या परीक्षा दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या परीक्षाप्रमाणेच घेण्यात याव्यात. अंतिम सत्र किंवा या पूर्वीच्या सत्रातील अनुत्तीर्ण, तसेच गैरहजर मात्र ज्यांनी अर्ज भरला आहे, त्यांच्या परीक्षा घेण्याची शिफारस करण्यात आली आहे. बीए. बीकॉम, बीएस्सी, ४५ हजार, एमए १८००, एसस्सी २५००, एम कॉम ५ हजार, बीबीए १२००, बीसीए १८००, एमसीए २००, एमबीए १ हजार, अभियांत्रिकी ९ हजार तर इतर अभ्यासक्रमाचे ६ हजार ४०० विद्यार्थी आहेत.

# अंतिम वर्षाच्या परीक्षा जुलैमध्ये

## राज्य सरकारचा निर्णय; शिवाजी विद्यापीठाची कार्यवाही सुरु

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ व महाविद्यालयीन अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा एक ते ३१ जुलै या कालावधीत घेण्याबाबत राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयाने हिरवा कंदील दाखवला आहे. दरम्यान, या संदर्भात शिवाजी विद्यापीठस्तरावर डॉ. धनाजी कणसे यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या १८ सदस्यीय समितीने सुरक्षित वावर नियमावलीचे पालन करून परीक्षांसंदर्भात वेळापत्रक करण्याबाबत शिफारशी केल्या होत्या. राज्य सरकारच्या निर्णयानंतर समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारे शिवाजी विद्यापीठाच्या वतीने जुलैमध्ये होणाऱ्या परीक्षांचे नियोजन करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

शिवाजी विद्यापीठातील ७५ हजार विद्यार्थी अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रामध्ये परीक्षा देणार आहेत. यामध्ये बीए ,बीकॉम, बीएस्सी ,बीबीए, बीसीए , एमसीए यासह अन्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. शैक्षणिक सत्र लांबणीवर गेल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी जुलैमध्ये परीक्षा घेऊन ऑगस्टपर्यंत निकाल जाहीर करून एक सप्टेंबरपासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू करावे, अशा पद्धतीची रचना राज्य सरकारच्या उच्च शिक्षण मंत्रालयाने केली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने परीक्षेबाबत विद्यापीठस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली होती. या समिती निर्देशानुसार विद्यापीठस्तरीय समितीने परीक्षांच्या नियोजनाबाबत केलेला शिफारस अहवाल विद्यापीठाच्या विद्या परिषद सदस्यांसमोर मांडण्यात आला होता. या अहवालास विद्या परिषदेच्या सदस्यांनी मान्यता दिली होती. विद्यापीठाने गठीत केलेल्या १८ सदस्यीय समितीचा अहवाल अधिकार मंडळासमोर सादर करण्यात आला आहे. या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या उन्हाळी सत्र परीक्षा व निकाल घोषित करण्याबाबत परीक्षा विभागाकडून कार्यवाही सुरु झाली आहे.

अंतिम सत्रासाठी परीक्षा अर्ज भरलेल्या परीक्षार्थींचे एक ते ३१ जुलै या कालावधीत लेखी, प्रात्यक्षिक, मौखिक परीक्षा आयोजन केले जाणार आहे. अंतिम वर्षाचे नियमित व रिपीटर परीक्षार्थी यांचा समावेश असेल. चालू सत्राव्यतिरिक्त पूर्वीच्या सत्रातील अनुत्तीर्ण व गैरहजर विषयांसाठी परीक्षा अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा जुलै महिन्यात होणार नसून पुढील चार महिन्यात आयोजित केली जाणार आहे.

फक्त चालू परीक्षेसाठी अंतिम वर्षाव्यतिरिक्त इतर वर्षाचे सर्व अभ्यासक्रमाचे परीक्षार्थी कॅरी फॉरवर्ड पद्धतीनुसार पुढील वर्षाच्या प्रवेशास पात्र असणार आहेत. वार्षिक परीक्षा पद्धती असणाऱ्या पदव्युतर पदविका, पदविका अभ्यासक्रमांच्या परीक्षार्थींसाठी अंतिम परीक्षेचे आयोजन करण्यात येणार असून त्यांनी परीक्षा देणे आवश्यक आहे. 'पर्यावरण अभ्यास'या विषयाची लेखी परीक्षा होणार नसून प्रकल्प, अंतर्गत गुणावर करुन श्रेणी, गुणदान करण्यात येणार आहे. परीक्षावेळी महाविद्यालयांनी विद्यार्थी व शिक्षक यांच्या सुरक्षेला प्राधान्य देत सॅनिटायजेशन प्रोटोकॉलचे पालन करणे गरजेचे आहे.

यूजीसी व सरकारकडून वेळोवेळी प्राप्त निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर.पळसे यांनी दिली.

### मुख्यमंत्र्यांची आज कुलगुरूंसमवेत बैठक

शैक्षणिक वेळापत्रक व अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासंदर्भात मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी शनिवारी (ता.३०) दुपारी साडेबारा वाजता राज्यातील सर्व कुलगुरुंची व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे बैठक बोलाविली आहे. यावेळी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांच्यासह मान्यवर सहभागी होणार आहेत.

### डॉ. कणसे समितीने सुचविलेल्या शिफारशी

- अंतिम वर्षाव्यतिरिक्त इतर वर्षांच्या सर्व अभ्यासक्रमांचे विद्यार्थी पुढील वर्षामध्ये प्रवेशासाठी पात्र राहतील.
- ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज भरणे काही कारणाने राहून गेले असेल त्यांना अर्ज भरण्याची संधी देण्यात यावी.
- पर्यावरण अभ्यास विषयाची लेखी परीक्षा न घेता प्रकल्प व अंतर्गत मूल्यांवर श्रेणी देण्यात यावी.
- श्रेणीसुधारणा करावयाची असेल तर त्यांना पुन्हा परीक्षा देण्याची संधी देण्यात यावी.
- अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्यात येत असताना एटीकेटी विद्यार्थ्यांबाबतही योग्य निर्णय घ्यावा.
- प्रत्यक्ष परीक्षा सुरू झाल्यानंतर दोन सत्रांत परीक्षांचे नियोजन करावे.